**नियमीत दिवाणी मुकदमा नं. २३/२०२२** **निशाणी ५३ पुढे**

सुधा निरगुडे वि. कोंडाजी निरगुडे व इतर.

**उलटतपास वादीतर्फे श्री. ए. पी. गंगावणे अधिवक्ता**

मला न्यायालयाचे साक्षीकामी हजर राहण्याचे समन्स प्राप्त नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयात काय साक्ष द्यावयाची आहे त्याबाबत प्रतिवादी व त्यांचे कुटुंबियांनी माहिति दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला दाव्याबाबतची माहिति व काय साक्ष द्यायची आहे त्याबाबतची माहिति कोंडाजी निरगुडे व कुटुंबियानी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौजे पांगरी येथील सुधा निरगुडे यांचे जमिनीपासुन माझी शेतजमिन दुर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे क्षेत्र व वादी यांचे क्षेत्र दुर असल्याने मी कधीही वादीचे क्षेत्रात गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील नमुद पंचनामा तलाठी यांनी पुर्वीच लिहुन ठेवला होता व माझी त्यावर सही घेतली होती. पंचनाम्यावेळी जागेवर मी व समाधान हजर होतो. आमचे व्यतिरीक्त इतर कोण हजर होते त्यांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकुर मी वाचून पाहिला नाही. सदरचा पंचनामा सन २०२१ साली १५ तारखेला झालेला आहे. पंचनामा कोणत्या महिन्यात झाला हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासातील संपुर्ण मजकुर कोंडाजी निरगुडे यांनी सांगितला होता मी केवळ सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांचेसोबत माझे चांगले व घरगुतीसंबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी सुधा निरगुडे गावात राहत असल्याचे त्यांच्याशी चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही केवळ प्रतिवादी कोंडाजी निरगुडे यांचे सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला गट नं. ५४० व ५४१ चा चतु:सिमा सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे

नाही की, मी सरतपासणीचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष,

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.04.18 12:49:20 +0530

ठिकाण— सिन्नर
दिनांक— १८.०४.२०२६

**(लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सिन्नर.